# V.P.M's
# B. N. Bandodkar College of Science, Thane
## Junior College
## S.Y.J.C First Terminal Examination October 2018
## Subject: Marathi

**Day: Saturday** **Time: 08.00am to 10.00am**
**Date: 27.10.2018** **Marks: 50**
**Note:** सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.

**कृती १** **कोणत्याही एका विषयावर ३०० शब्दांत निबंध लिहा.** १०

१. मी शिक्षक झालो तर
२. एका सैनिकाचे आत्मवृत्त
३. आजचे चित्रपट आणि समाज
४. किल्ल्याचे संवर्धन काळाजी गरज

**कृती २** **अ. खालील उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

१. सेंट मेरी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी डॉ. अब्दुल कलाम यांना विचारलेले प्रश्न ०१

१) [ ]

२) [ ]

एका प्रसंगी मी तामिळनाडूतल्या डिंडीगुल इथल्या सेंट मेरी स्कूलच्या विदयार्थ्यांसमोर उभा होतो. विद्यार्थ्यांची संख्या प्रचंड होती. या शाळेचा पंच्याहत्तरावा वर्धापनदिन त्या दिवशी साजरा होत होता. मला भेटायला खूप मुलं उत्सुक होती पण त्यातली प्रामुख्याने दोन मुले अशी होती की ज्यांना मला एक प्रश्न विचारण्याची फार घाई झालेली दिसली. त्यातल्या एकाने मला विचारलं होतं, मी तुम्ही लिहिलेलं 'अग्नी सिरागुगल' (विंग्ज ऑफ फायर' या तामिळ अनुवाद) वाचलं. तुम्ही त्यामध्ये 'स्वप्न पहा' असा सल्ला दिलाय. मला सांगा का पहायची स्वप्नं ?

उत्तरादाखल मी जमलेल्या मुलांना सुरात म्हणायला सांगितले, 'स्वप्न, स्वप्न, स्वप्न, स्वप्न विचारांमध्ये रूपांतरित होतात आणि विचार कृतीमध्ये !' नंतर मी त्यांना सांगितलं, जर स्वप्ने नसतील तर आमूलाग्र किंवा क्रांतिकारी विचार निर्माणच होणार नाहीत आणि जर विचारच नसतील तर मग कुठलेही कार्य आपल्याकडून होणार नाही म्हणून शिक्षक आणि पालकांनी, विद्यार्थ्यांना स्वप्ने पहायची परवानगी दयावी. स्वप्नांच्या माध्यमातुनच माणूस यशस्वितेपर्यंत पोहोचतो, मग या मार्गावर कितीही संकटे आली किंवा विलंब झाले तरी.

आणखी एका मुलाने विचारलं, 'जगातला पहिला शास्त्रज्ञ कोण असतो?' मला माहीत होतं की विज्ञानाची वृदधी फक्त प्रश्नांमधूनच होते. प्रश्न हाच विज्ञानाचा पाया आहे शिक्षक व पालक हे पूर्णपणे जाणतात की मुलांकडे न संपणारे प्रश्न असतात म्हणून मी झटकन म्हणालो, 'बालक हा पहिला शास्त्रज्ञ असतो'. माझ्या या वाक्यावर मुलांनी टाळयांचा गजर केला. माझी विचार करण्याची वेगळी पदधत मुलांना आवडून गेली. शिक्षक आणि पालकांना देखील माझ्या उत्तराने समाधान वाटले. त्यांच्या चेह-यावर स्मित होतं.

२. [ ] हाच विज्ञानाचा पाया आहे. ०१

३. उद्याचा प्रगतीशिल भारत घडविण्यासाठी विद्यार्थ्यांनी कोणते योगदान दिले पाहिजे असे तुम्हाला वाटते, ते स्पष्ट कता. ०३

कृती २ ब. खालील उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

१. पाण्यावर सांडलेल चादण पाहिलं की लेखिकेच्या मनात येणारे विचार. ०१



मुरूडला आले अन् प्रथम पाहिला. तशी मुंबईची चौपाटी माहीत होती, पण तिचं नातं भेळेशी आणि मसाल्याच्या गोड पानपट्टीशी होतं. मुरूडचा समुद्र हा असा अजगरासारखा पहुडलेला. आपल्याच मस्तीत, दिमाखात. कडेनं रूपेरी मऊ वाळू. क्षितिजाच्या टोकाला भिडलेलं चमचमंत पाणी, आकाशाशी संवाद साधणारं. वाळूवर टेकलं की आकाशाचं रूप समुद्रात बघावं. पाण्यातच उभा असलेल्या एकांतप्रिय 'कासा' चा किल्ला. दूर दुस-या टोकाला खडकावर विसावलेला नबाबसाहेबांचा बंगला. हे सगळं मला अपूपच होतं.

मी वेडयासारखी समुद्र पहात रहायची. कधी सकाळी तर कधी चांदण्या रात्री. पाण्यावर सांडलेलं चांदणं पाहिलं की वाटायचं सगळा समुद्र ओंजळीत पकडावा. कसं थंड, शांत वाटायचं. मनातले सगळे विकल्प लयाला गेले असायचे. अवघं अस्तित्व निरामय होऊन जायचं. आपण आणि हा अथांग पसरलेला समुद्र! बाकीची जाग-जाण मिटलेली असायची. अशी अभूतपूर्व शांतता मी पूर्वी कधी अनुभवलेली नव्हती. मुरूडच्या समुद्रानं मला बांधून ठेवलं. मी लिहायला लागले त्यामागे या मुरूडच्या समुद्राची फार मोठी प्रेरणा आहे. पुढे पुढे येणा-या लाटा म्हणजे महत्त्वाकांक्षा, यश आणि आत्मविश्वासाचं प्रतीक वाटायच्या, तर मागे मागे सरकणा-या लाटा म्हणजे पराभव, अपयश, मानहानी पचवणारी शक्ती. समुद्राच्या पोटात किती काय काय दडलं असेल! त्यानं किती पचवलं असेल, किती सहन केलं असेल. माणसाच्या मनाचं मला ते दुसरं रूप वाटायचं. समुद्राशी माझा संवाद चालायचा. माझ्या एकटेपणाच्या, पोरकेपणाच्या जगण्यात समुद्राची सोबत मला फार मोठा आधार देऊन गेली. मी मोकळेपणी गाऊ लागले, हसू लागले, स्वतःशीच संवाद साधू लागले. मुरूडच्या समुद्रानं माझ्या लेखणीला शब्द दिले, विचारांना दिशा दिली आणि माझ्यातली काव्यात्मवृत्ती जागवली.

२. पुढे येणा-या लाटा व मागे जाणा-या लाटा कोणत्या गोष्टीचे प्रतीक आहेत. ०१

३. समुद्र किना-याचे जतन व रक्षण करणे गरजेचे आहे स्वमत स्पष्ट करा. ०३

क. खालील उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

१. ०२




अशा त्या भकास, रूक्ष ठिकाणी जन्म घ्यावा असे कुठल्याही शहाण्या भुताला वाटले नसते. पण शहाणा आणि गाढव दोन प्रकार माणसांप्रमाणेच भुतांतही असल्यामुळे एक भूत, ते नको म्हणत असताना त्या ठिकाणी जन्माला आले. आपण जन्माला यावे ते कुणाच्या हातात नसते. त्यामुळे या भुताला या गुंडगुळयाच्या माळावर अगदी नाक मुठीत धरून जगात घ्यावी लागली.

म्हणजे झाले काय, त्या दिवशी अमावास्या होती. रात्रीचा काळाकुट्ट अंधार सगळीकडे दाटला

होता आणि अशा भयानक पैलवान तुकाराम लांडगे हा त्या माळावरच्या गाडीवाटेने वस्तीकडे चालला होता. तुकाराम म्हणजे देशमुखाने पाळलेला पठ्ठया होता. रोजचे पाचपाचशे जोर आणि 'खाटुमखुटुम' जेवण कधी चुकत नसल्यामुळे त्याच्या दंडाच्या बेडक्या कडक फुगल्या होत्या. मांडीचे पट फिरत होते. गर्दन उतू चालली होती, आणि आधीच आखूड असलेले नाक गालात गडप झाले होते. कानाशिलां गुच्चे बसून बसून त्यांची भजी झाली होती. तो चालू लागला म्हणजे एखादा अंबारीचा हत्ती झुलल्यासारखे वाटत असे.

२. वैज्ञानिक दृष्टिकोनामुळे अंधश्रद्धा दूर होऊ शकते का स्वमत लिहा. ०४

**कृती ३** **खालील काव्यपंक्तीच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

पाहे पर-दारा जननीसमान | द्रव्यही पाषाण-सम मानीं ॥ १ ॥
पराव्याकारणें प्राण वेची आतां | जाणें पर-व्यथा अंतरीची ॥ २ ॥
विहित संतोष धरीं बा मानसीं | कीं पर-लोकासी जाणें आहे ॥ ३ ॥
सर्व काळ प्रीति संतांचीया संगें | गावें अनुरागें हरी-नाम ॥ ४ ॥
सर्वांभूतीं सम ठेवूनींया बुद्धी | सांडावि उपाधी प्रपंचाची ॥ ५ ॥
सर्व परमात्मा सर्व काळी देशीं | भाव अहर्निशीं दृढ धरीं ॥ ६ ॥
संत-समुदाय मिळतील जेथें | लोटांगणें तेथें जावें आधीं ॥ ७ ॥
चिंता नको नाम्या तरसी तूं जाण | सांगितली खूण मनें माझ्या ॥ ८ ॥

१. प्रापंचिकाने परस्त्रीकडे कोणत्या दृष्टीने पहावे ☐ ०१

शब्दांचा प्रमाणभाषेतील अर्थ लिहा.

१) पर-दार ☐
२. २) पाषाण ☐ ०२
३) परावा ☐
४) संतोष ☐

३. पहे पर-दारा जननीसमान | द्रव्यही पाषाण- सम मानी ॥ ०२

**कृती४. अ. खालील कवितेचे १५ ते २० ओळीत रसग्रहण करा.** ०६

**आत्महत्या हा पर्याय नाही**

अपयश ही यशाची पहिली असते.
जीवनातल्या अनुभवांची डायरी असते.
त्यातूनच प्रत्येकाचे घडत जाते भविष्य
मग कळून येते किती सुंदर आहे आयुष्य
प्रयत्नांच्या बळावर सर करता येते शिखर
'लाथ मारेन तिथे पाणी काढेन' ही ठेवा जिगर
कठल्याही समस्येला नाही आत्महत्या हा पर्याय
सदा पुढेच जायचे संकटावर ठेवून पाय
नापास होण म्हणजे नाही आभाळ कोसळणं
जीवन म्हणजे असत निरंतर शिकणं
परीक्षा नाही ठरवू शकत आयुष्याचे मोल
अंगी बाणवावी कला अन् सावरावा तोल
दुर्गम कडा भेदण्याची ठेवा दुर्दम्य अभिलाषा
मग येणारच नाही तुमच्याजवळ निराशा

कवी - मुबारक शेख

किंवा

**संवाद लेखन लिहा (कोणतेही एक).**

१. अभ्यासाचे नियोजन कसे करावे याबाबत मित्राशी संवाद

२. वाढत्या महागाईबद्दल दोन गृहिणीमधील संवाद

**ब. व्याकरण.**

**अ. निर्दोष शब्दाचा योग्य पर्याय निवडा.** ०२

१. य) समासिक र) सामासिक ल) सामसिक व) नमांकित

२. य) कीडांगण र) किडांगण ल) किडांगन व) कीडांगन

**ब. खालील वाक्प्रचारांचा अर्थ वाक्प्रचारांसमोर चौकटीत लिहा** ०२

य) वाजंत्री वाजवणे र) मनाला लहर येणे ल) प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न करणे व) इच्छा पूर्ण होणे

१. गाजावाजा करणे ⟶ ☐

२. मनोरथ पूर्ण होणे ⟶ ☐

**क. खालील दिलेल्या पर्यायातून पारिभाषिक शब्दांसाठी योग्य पर्याय निवडून चौकटीत लिहा.** ०२

य) कार्यक्षमता र) भकार्यक्षमता ल) प्रतिष्ठान व) गौरव

1. Ability ⟶ ☐

2. Foundation ⟶ ☐

**ड. खालील विधानातील रस ओळखून चौकटीत लिहा.** ०२

१. समरपुरचे वारकरी हो समरदेवता बोलविते |

अ) हस्यरस आ) वीररस इ) बीभत्सरस ई) शृंगाररस

२. आनंदाचे डोही आनंद तरंग.....!

अ) हस्यरस आ) वीररस इ) शांतरस ई) शृंगाररस

**कृती ५ खालील कोणतीही एक कृती सोडवा.** ०५

१. दिलेल्या मुद्दयांच्या आधारे अग्रलेखासंबधी माहिती लिहा.

१) अग्रलेख म्हणजे- अग्रलेखाचे महत्व व भूमिका-
काही प्रमुख संपादकांची नावे- अग्रलेख व बातमी स्पष्टीकरण- वाचक आणि अग्रलेखाचे नाते

२) लेख म्हणजे- लेखाची गरज-लेखाचे प्रकार- बातमी व
लेख यातील फरक-लेखाची उपयुक्तता- वृत्तपत्रातील लेखाचे स्थान

~*~*~*~*~*~*~